सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव – भालचन्द्र विठ्ठल कुकडे,
वय – ५९ वर्ष, व्यवसाय – काही नाही.
राहणार – मौदा, ता. मौदा,जिल्हा – नागपूर

सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा

दिनांक ३१.७.२०१८ रोजी पोलीसांनी मला पंचनामाकामी पोलीस स्टेशन येथे बोलविले होते. तेथे पोलीसांनी मला काय घटना घडली याची विचारपुस केली होती. त्यामुळे मी घडलेल्या घटनेबाबत पोलीसांना सांगितले. त्यादिवशी माझी गोपाल कंपनीमध्ये सुरक्षा रक्षक म्हणुन नाईट डयुटी मेन गेटवर होती. मी डयुटी करुन निघुन गेलो होतो. दुस–या दिवशी सकाळी मला सेक्युरिटी इन्चार्ज याने बोलाविले व चोरी झाल्याचे त्याने मला सांगितले होते. ते मी पोलीसांना सांगितले होते. त्यावेळी माझेसोबत सुरेश पायतोडे हा दुसरा सुरक्षा रक्षक होता. त्यानेच मला पोलीस स्टेशन मौदा येथे त्याचेसोबत नेले होते. सुरेश पायतोडे याने पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. आम्ही पोलीस स्टेशन येथे गेलो तेव्हा घटनेतील कोणताही आरोपी तेथे नव्हता. माझेसमक्ष कोणत्याही आरोपीने कबुली जबाब दिला नाही. आता मला कबुली जबाब दाखविला. त्यावर माझी सही असुन त्यातील काही मजकुर बरोबर असुन काही चुकीचा आहे. आरोपी ब्रजगोपाल याला मी ओळखत नाही. त्याने माझेसमक्ष पोलीसांना बयान दिले नव्हते. करिता सदर कबुली जबाबास सहीपुरता **निशानी क्रमाक १०** देण्यात येते. मी त्यादिवशी आरोपी व पोलीसांसोबत कोठेही गेलो नव्हतो. माझेसमक्ष आरोपी ब्रजगोपाल याने काहीही काढुन दिले नाही. आता मला मेमोरेंडम पंचनामा दाखविला त्यावर माझी सही असुन मजकुर बरोबर नाही. करिता सदर पंचनाम्यास सहीपुरता **निशानी क्रमांक ११** देण्यात येते.

**साक्षीदार सरकारी पक्षास समर्थन करीत नसल्याने सरकारी वकिलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली करिता परवानगी देण्यात येते.**

हे म्हणणे खरे आहे कि सन २०१८ मध्ये मी गोपाल कंपनीत सुरक्षा रक्षक म्हणुन काम करता होतो. हे म्हणणे खरे आहे की माझी डयुटी त्यावेळी रात्री ८.०० ते सकाळी ८.०० या कालावधीत होती. हे म्हणणे खरे आहे की सुरेश पायतोडे हा त्याच कंपनीत सुरक्षा रक्षक म्हणुन कामास होता. हे म्हणणे खरे आहे की त्याची डयुटी सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० या कालावधीत होती. हे म्हणणे खरे आहे की दिनांक २८.७.२०१८ रोजी सुरेश पायतोडे याने सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० या कालावधीत डयुटी करुन संध्याकाळी ८.०० वाजता माझेकडे चार्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की दुस–या दिवशी सकाळी सुरेश डयुटीवर आला असता त्याला कंपनीतुन लोखंडी अँगल व रिंग चोरी गेल्याचे माहीत झाले होते. हे म्हणणे खरे आहे की त्या घटनेबाबत सुरेश याने फिर्याद दिली होती. हे मला माहीत नाही कि त्या फिर्यादवरुन पोलीसांनी आरोपी ब्रजगोपाल आणि रामु शाहु यांना अटक केली होती. हे मला माहीत नाही कि रामु शाहु याचे दुकान तारसा फाटा येथे आहे. हे मला माहीत नाही कि ब्रजगोपाल याचे तारसा फाटयाचे अलीकडे कबाडीचे दुकान आहे. हे मला माहीत नाही कि आम्ही दिनांक ३१.७.२०१८ रोजी पोलीस स्टेशन येथे गेलो असता आरोपी ब्रजगोपाल याला पोलीसांनी अटक केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी माझेसोबत दुसरा पंच राजु शाहू हा होता. हे म्हणणे खरे नाही की तेव्हा आरोपी ब्रजगोपाल याने आमचेसमक्ष गोपाल कंपनीतुन चोरी केल्याचे कबुल करुन चोरी केलेला माल कबाडीच्या दुकानात ठेवला असुन तो काढुन देतो असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की तो जबाब पोलीसांनी माझेसमक्ष लिहुन घेवुन त्यावर आरोपीची व आम्हा पंचांची सही घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर आम्ही आरोपी व पोलीसांसोबत रामटेककडे तारसा फाटा येथे जाण्यास निघालो होतो. हे म्हणणे खरे नाही की तेव्हा आरोपी ब्रजगोपाल याने तारसा फाटा येण्याचे अगोदरच एक कबाडीचे दुकान दाखवुन तेथे थांबण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की ब्रजगोपाल याने त्या कबाडीचे दुकानाचे मागे जावुन एका नायलॉनचे बोरीत असलेल्या सलाख काढुन दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की तो सलाख अंदाजे ६० किलो वजनाचा होता. हे म्हणणे खरे नाही की तो लोहा पोलीसांनी माझेसमक्ष जप्त करुन त्याबाबतचा जप्ती

पंचनामा आम्हा पंचासमक्ष तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की त्या पंचनाम्यावर मी वाचुन व समजुन सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपी ब्रजगोपाल याला ओळखत असुन त्याला वाचविण्यासाठी आजरोजी न्यायालयासमक्ष खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीचे अॅड.श्रीमती डागा यांचे द्वारे –**

उलटतपास नाकारला.

फेरतपास काही नाही. समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत.

मौदा.

दिनांक १९.०४.२०२२

(एस.पी वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा